महानिर्मिती
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित
दुरध्वनी क्र. : २६४७ ४२११ विस्तारित ३६४२ दूरभाष क्र. : ०२२-२६५८ १५१६.
२रा माळा, प्रकाशगड, बांद्रा (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.
ई-मेल : promahagenco@gmail.com / aphale.mahesh@gmail.com

संदर्भ : मा.सं./जनसंपर्क/प्रेस नोट/६१

## वृत्तपत्रीय निवेदन

## भुसावळ प्रकल्प येथे अपघातग्रस्तांच्या सुटकेसाठी अहोरात्र प्रयत्न सुरु

महानिर्मितीच्या भुसावळ विस्तारित प्रकल्प येथे ५०० मेगावॅटचे दोन संच (संच क्र. ४ आणि ५) यांचे उभारणीचे काम सुरु आहे. प्रकल्पस्थळी २७५ मीटर उंचीच्या चिमनी शेल उभारणीचे काम पूर्ण झाले असून त्यातील संच क्र. ४ साठीच्या फ्लू केनचे कामदेखील पूर्ण करुन मे. भारत हेवी इलेक्ट्रिकल्स लि. यांना डक्ट पाईप जोडण्यासाठी यापूर्वीच हस्तांतरित करण्यात आले होते. तसेच संच क्र. ५ साठीच्या २७५ मीटरचे १२० मीटर या टप्प्यातील फ्लू केन उभारणीचे कामदेखील पूर्ण झाले होते. दि. २८/०७/२०१० रोजी रात्री ९.४५ वा. सदर प्रकल्पातील संच क्र. ५ येथे मे. गॅमन इंडिया प्रा. लि. (मे. टाटा प्रोजेक्ट लि., हैद्राबाद यांचे कंत्राटदार) यांचेतर्फे चिमणी फ्लू केनचे काम सुमारे १२० मीटर उंचीवर सुरु होते. त्यावेळी अचानक दोन्ही संचांचे फ्लू केन हे त्यांचे विविध पातळ्यांवरील आधार (support) तोडून खाली कोसळले. कंत्राटदार कंपनी मे. टाटा प्रोजेक्ट लि. व मे. गॅमन इंडिया प्रा. लि. यांनी दिलेल्या माहितीनुसार अपघातप्रसंगी घटनास्थळी ५ कर्मचारी काम करीत होते व ते १२० मीटर पातळीवरील पॅसेंजर उद्वाहक (लिफ्ट) मध्ये होते. अपघात घडताच त्यातील ४ कर्मचारी हे त्वरेने बाहेरील प्लॅटफॉर्मवर उतरले व त्यांची रात्री ११.४५ वाजता विंच यंत्राच्या सहाय्याने सुखरुप सुटका करण्यात आली.

तसेच उर्वरित एका संभाव्य व्यक्तीच्या सुटकेसाठी विशेष कृती दलाने रातोरात तातडीने विंच यंत्रणाच्या माध्यमातून १२० मीटर उंचीच्या पातळीवर जाऊन अथक प्रयत्न केले, तथापि, सोसाट्याचा वारा व चिमनीच्या आतमध्ये कोसळलेला फ्लू केनचा भाग तसेच रात्रीचा अंधार यामुळे सुटकेच्या शोधकार्यात अडचणी आल्या.

मात्र दि. २९ जुलै रोजी पहाटेपासून पुन्हा सुटकेचे शोधकार्य सुरु करण्यात आले. अडकलेल्या व्यक्तीला बाहेर काढण्याकरिता मे. गॅमन इंडिया प्रा. लि. कंपनीच्या कुशल तंत्रज्ञांना १६० मीटर उंचीच्या प्लॅटफॉर्मवर पाठविण्यात यश आले. तिथे त्यांना पॅसेंजर लिफ्टजवळ एक जखमी पाय तुटलेला आढळला, त्यामुळे त्वरेने १२० मीटर / ८० मीटर / ४० मीटर या पातळीवरील प्लॅटफॉर्मवरुन पुन्हा शोधकार्य करण्यात आले. रोप लॅडरचा वापर करुन व जीवाची बाजी लावून या शोधकार्यात सुमारे १२ व्यक्तींनी सहभाग घेतला. तथापि, या सर्व शोधकार्यात मृतदेह कुठेही आढळला नाही. त्यामुळे संभाव्य मृतदेह हा कदाचित चिमनीत खाली कोसळलेल्या फ्लू केन, गर्डर्स व ग्लास वूलच्या ढिगाऱ्याखाली गाढला गेला असावा, असा अंदाज व्यक्त करण्यात आला. त्यानुसार हा ढिगारा सुयोग्य पध्दतीने उपसून काढता यावा यासाठी मे. गॅमन इंडिया प्रा. लि. कंपनीच्या तज्ज्ञ चमूला पाचारण करण्यात आले. या चमूतील मे. गॅमन इंडिया प्रा. लि. कंपनीचे आपत्ती व्यवस्थापन, दर्जा नियंत्रण, सुरक्षितता व आराखडा विभागाचे प्रमुख त्वरेने अन्य ठिकाणांहून घटनास्थळी हजर झाले. त्याचप्रमाणे महानिर्मिती, डी.सी.पी.एल. व मे. टाटा प्रोजेक्ट लि. चे आराखडा तज्ज्ञ देखील त्वरेने अन्य ठिकाणांहून घटनास्थळी हजर झाले.

कोसळलेला ढिगारा हा सध्या चिमनीच्या आतील भागात जमिनीपासून सुमारे ८० मीटर उंचीच्या पातळीपर्यंत पसरलेला असून त्याचे अंदाजे वजन १२०० मेट्रिक टन इतके आहे. त्यातील ग्लास वूल इन्स्युलेशन ठिकठिकाणी उसविल्याने तसेच चिमनीत कोसळलेल्या ढिगाऱ्याजवळची उपलब्ध असलेली अत्यंत मर्यादित जागा लक्षात घेता अपघातग्रस्त व्यक्तीचा शोध घेणे दुरापास्त झाले होते.

काल दि. २९ जुलै रोजी या शोधकार्यासाठी व ढिगारा उपसून काढण्यासाठी आवश्यक असणाऱ्या गॅंट्री व शिडीची उभारणी करण्याचे काम युध्दपातळीवर केले गेले. या मदतकार्यात चिमनीच्या आतील व बाहेरील भागात प्रत्येक पातळीवरील प्लॅटफॉर्मवर पुरेसा प्रकाश मिळावा. यासाठी देखील दिव्यांची सर्वतोपरी व्यवस्था करण्यात आली. तसेच सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून चिमनीच्या बाहेरील भाग कुंपण घालून सिमीत करण्यात आला. घटनास्थळी अनावश्यक गर्दी टाळण्यासाठी व त्यायोगे मदतकार्यात कोणताही अडथळा येऊ नये या दृष्टीकोनातून परिसरातील नागरिक व कर्मचारी यांना वारंवार सुचित करण्यात आले. त्यासाठी महानिर्मितीसह मे. टाटा प्रोजेक्ट व

मे. गॅमन इंडिया प्रा. लि. चे अनेक कर्मचारी स्वयंस्फूर्तीने अहोरात्र कार्यरत होते. तसेच या मदतकार्यात सर्वांनी एकजूटीने तसेच सुरक्षिततेचे पूर्ण अवधान राखून सहभागी व्हावे यासाठी त्यांचे मनोबल वाढविण्याकरिता सर्व संभाव्य सहभागींचे समुपदेशन करण्यात आले.

आज दि. ३० जुलै रोजी पुन्हा पहाटेपासून मे. गॅमन इंडिया प्रा. लि. व मे. टाटा प्रोजेक्ट लि. यांचे तज्ञांच्या सल्ल्यानुसार कोसळलेल्या ढिगाऱ्याचा उपसा करण्याचे काम सुरु करण्यात आले आहे. या कार्यपध्दतीत चिमनीचा तळाचा दर्शनी भाग, तसेच डक्ट ओपनिंग व चिमनीचा सर्वांत वरचा भाग या तीनही पातळ्यांवरुन हा ढिगारा काळजीपूर्वक काढण्यात येणार आहे. मुख्य चिमनी धुराड्याला कोणतीही इजा पोहोचणार नाही, याची पुरेपूर दक्षता घेऊन तसेच मदतकार्यात सहभागी कर्मचाऱ्यांची सुरक्षितता पूर्णतः लक्षात घेऊन हा ढिगारा उपसण्याचे प्रयत्न सध्या युध्दपातळीवर सुरु आहेत. बेपत्ता व्यक्तींचा शोध लागेपर्यंत हे कार्य सातत्याने सुरु ठेवण्यात येणार आहे.

या संपूर्ण शोध मोहिमेत व्यक्तिशः देखरेख करण्यासाठी व परिस्थितीवर नियंत्रण मिळविण्यासाठी महानिर्मितीचे संचालक (प्रकल्प) श्री. चंद्रकांत थोटवे, कार्यकारी संचालक (प्रकल्प) श्री. अरुण डवलेकर व अन्य वरिष्ठ अधिकारी दि. २९ जुलैपासून जातीने हजर आहेत.

तसेच सदर दुर्घटनेची संपूर्णपणे चौकशी करण्यासाठी महानिर्मितीने संचालक (प्रकल्प) श्री. चंद्रकांत थोटवे यांच्या अध्यक्षतेखाली एक त्रिसदस्यीय समिती नेमली असून श्री. आर.के. गोयल व श्री. ए.एस. पराते हे या समितीचे अन्य सदस्य आहेत. सदर समितीने तातडीने १५ दिवसांत आपला अहवाल सादर करावा, असे आदेश महानिर्मितीने दिले आहेत.

---

दिनांक : ३०/०७/२०१०.

प्रति,
**माननीय संपादक,**
दैनिक

आदरणीय महोदय,

कृपया सदर वृत्तपत्रीय निवेदन आपल्या माहितीकरिता सोबत जोडत आहे.

धन्यवादासह,

आपला स्नेहांकित,

**जनसंपर्क अधिकारी**